बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अंतर्गत ग्रामीण क्षेत्रातील विद्यार्थ्यांना वाहतूक सुविधा पुरविणे बाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः पीआरई २०१५/( ७२ / १५) एस एम-६**
मादाम कामा रोड,मंत्रालय विस्तारभवन
मुंबई-४०० ०३२
तारीख: ६ मे ,२०१५

<u>वाचा -</u>

1) **शासन निर्णय क्रमांकः बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम,२००९.**
2) **शासन निर्णय क्रमांकः महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम,२०११**
3) **शासन निर्णय क्रमांकः शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,क्रमांक पीआरई - २०११/प्र.क्र.११४/प्राशि-१ दिनांक १ मार्च २०११ .**

<u>प्रस्तावना -</u>

केंद्र सरकारने सन २००२ च्या ८६ व्या संविधान विशोधन अधिनियमान्वये अनुच्छेद २१ (अे) मध्ये प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचा समावेश केला आहे. त्यानुसार ६ ते १४ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम, Right of children to Free and Comulsory Education Act,२००९ (No. ३५ २००९), केंद्र शासनाने पारित करून तो भारत सरकारच्या २७/८/२००९ च्या राजपत्रात प्रसिध्द केला आहे. तसेच भारत सरकारच्या दिनांक १६/२/२०१० च्या राजपत्रात सदर अधिनियम , दिनांक १/४/२०१० पासून संपूर्ण भारतात (जम्मू व काश्मिर वगळता) लागू केला आहे.

भारत सरकारच्या सर्व शिक्षा अभियान उपक्रमाच्या अंमलबजावणीचे निकषामध्ये “Framework for Implementation of Sarva Shiksha Abhiyan Children in remote habitations with sparse population or in urban areas where availability of land is a problem may not find access to neighbourhood schools. Similarly, children from extremely deprived groups and children with special needs may require transportation /escort facilities. Such children may be provided support for transportation /escort” असे नमूद केले आहे.

समता, सामाजिक न्याय , लोकशाही आणि मानवी समाजामध्ये न्यायाची प्रस्थापना ही मूल्ये, सर्व मुलांच्या प्राथमिक शिक्षणाच्या माध्यमातून साधली जावू शकतात, या दृष्टीने हा अधिनियम अंमलात आणला आहे. त्यामुळे ६ ते १४ वयोगटातील बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण पुरविण्याची, त्यांना शाळांमध्ये प्रवेश देण्याची, उपस्थितीची आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारली आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम,२००९ मधील प्रकरण कलम ८ (ब) अनुसार बालकांना प्राथमिक शाळा ही त्यांच्या घराशेजारी उपलब्ध करून देण्याची तरतूद शासनाच्या संदर्भिय शासन निर्णयानुसार करण्यात आली आहे.

मात्र ज्या ठिकाणी नजिकची शाळा उपलब्ध करता येत नाही. अशा ठिकाणच्या शाळा विरहित वस्तीतील ६ ते १४ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना नियमित शाळेत जाण्यासाठी वाहतूक सुविधा पुरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय-

बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या अधिकार अधिनियम, २००९ मधील भाग तीन कलम ६(३) (१) अनुसार ग्रामीण क्षेत्रातील ज्या शाळा नसलेल्या वस्त्यांमधील ६ ते १४ वर्ष वयोगटातील मुलांच्या प्राथमिक शिक्षणाकरीता १ कि. मी. परिसरात प्राथमिक शाळा व ३ कि. मी. परिसरात उच्च प्राथमिक शाळा शासनाच्या नविन शाळा सुरु करण्याच्या निकषानुसार उपलब्ध करुन देता येत नसेल अशा शाळा नसलेल्या वस्तीतील विद्यार्थ्यांसाठी वाहतूक सूविधा पुरविण्यात येईल अशी तरतूद आहे. सर्व शिक्षा अभियानांतर्गत वार्षिक कार्य योजना व अंदाजपत्रक सन २०१५-१६ च्या अनुषंगाने जिल्हयांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार राज्यातील ग्रामीण क्षेत्रातील २,२१६ शाळाविरहित वस्त्यांमधील १४०८७ विद्यार्थ्यांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. सदर मुलांना त्यांच्या नजिकच्या नियमित प्राथमिक शाळेत जाण्या-येण्यासाठी एस.टी.ची सोय अथवा मासीक एस.टी.पासची सोय ज्याठिकाणी उपलब्ध नसेल तेथे अधिकृत खाजगी वाहनाची सुविधा पुरविण्यासाठी केंद्र शासनाकडून वाहतूकीकरीता अनुदान मंजुरीच्या अधिन राहून प्रत्येक महिन्याकरिता अंदाजे सरासरी खर्च रु. ३००/- (रुपये तीनशे फक्त) प्रमाणे १० महिन्यांकरीता अधिकतम रु. ३०००/- (रुपये तीन हजार फक्त) च्या मर्यादेत होणारा प्रत्यक्ष खर्च मंजूर करण्यास शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात येत आहे. आहे. सदर खर्च सर्व शिक्षा अभियानाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात येईल.

सदर योजनेचा लाभ देताना खालील अटी शर्तींचे काटेकोरपणे पालन करावे

१) वाहतूक सुविधेसाठी प्रथम एसटी महामंडळाच्या मासिक पास सुविधेचा विद्यार्थ्यांना लाभ देण्यात यावा.
२) जर एसटी महामंडळाची सेवा-सुविधा सदरच्या ठिकाणी उपलब्ध होत नसेल तर मान्यता प्राप्त खाजगी वाहतूकीसाठी शाळा व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने परवानगी देण्यात यावी.
३) प्रवास सुविधा देतांना वापरण्यात येणारे वाहन हे प्रवासासाठी सुरक्षित असल्याची खात्री करून घ्यावी. वाहन क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी वाहनातून प्रवास करणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.
४) वाहतूक सुविधेसाठी लाभार्थी विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे लाभ मिळत असल्या बाबतची खात्री केंद्र प्रमुख, साधन व्यक्ती, गट समूह साधन केंद्रातील अधिकारी व जिल्हा कार्यालयातील अधिका-यांनी वेळोवेळी भेटी देऊन करावी.
५) इयत्ता ५ वी व ८ वी मधील मुले/मुली यांना शासनाच्या अन्य योजनेखाली मोफत सायकल पुरविण्यात आली असेल त्यांना ही सुविधा लागू करण्यात येऊ नये.

सदरची अंमलबजावणी करण्याकरीता आवश्यक सर्व शिक्षा अभियानाच्या मार्गदर्शक सूचना महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे देण्यात येतील.

सोबत जिल्हयांकडून प्राप्त झालेली जिल्हानिहाय पात्र विद्यार्थ्यांच्या संख्येची यादी जोडली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०५०६१६४३३३२४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2015.05.12 13:14:23 +05'30'

**( राजेंद्र पवार )**
उप सचिव , महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण ) यांचे खाजगी सचिव
२. मा. मंत्री ,यांचे खाजगी सचिव (सर्व)
३. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक
४. प्रधान सचिव ,शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, यांचे स्वीय सहायक
५. सर्व प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. आयुक्त, (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
७. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
८. सर्व जिल्हाधिकारी
९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०.शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे
११.शिक्षण संचालक, प्राथमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२.शिक्षण संचालक, (अल्पसंख्यांक व प्रौढ) शिक्षण संचालनालय, पुणे
१३.संचालक, महाराष्ट्र राज्य, परिक्षा परिषद, पुणे
१४.संचालक, महाराष्ट्र राज्य, शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
१५.संचालक, महाराष्ट्र राज्य, पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ(बालभारती), पुणे
१६.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ,पुणे
१७.सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक/ उच्च माध्यमिक/ प्रौढ), जिल्हा परिषद
१८.सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/ नगरपरिषद
१९. प्रशासन अधिकारी, नगरपरिषद/ कटकमंडळे
२०.शिक्षण निरिक्षक ( दक्षिण/ पश्चिम/ उत्तर ) बृहन्मुंबई
२१.महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र ½, मुंबई/ नागपूर
२२.संचालक, लेखा व कोषागरे ,मुंबई.
२३.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
२४.अर्थसंकल्प शाखा, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई
२५.निवड नस्ती (एस एम-६).

| वाहतूक सुविधेसाठी जिल्हानिहाय पात्र विदयार्थी संख्येची यादी. | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | प्राथमिक | उच्च प्राथमिक |
| १. | अहमदनगर | ९०५ | १९५ |
| २. | अकोला | ३६७ | २१ |
| ३. | अमरावती | ३९ | ३७४ |
| ४. | औरंगाबाद | ९७४ | ६४८ |
| ५. | बीड | २५९ | ३८४ |
| ६. | भंडारा | ४७ | २० |
| ७. | बुलढाणा | १११ | ४५१ |
| ८. | चंद्रपूर | ३५ | २५७ |
| ९. | गडचिरोली | ५०५ | १२४४ |
| १०. | गोंदिया | २४२ | १६८ |
| ११. | जालना | २१३ | १३६ |
| १२. | कोल्हापूर | २३५ | १९ |
| १३. | नागपूर | २७५ | ५४१ |
| १४. | नंदूरबार | ० | ६ |
| १५. | उस्मानाबाद | ९३ | ६४ |
| १६. | परभणी | ४२ | १५८ |
| १७. | पुणे | ४७८ | ६६ |
| १८. | रायगड | १४३ | ३६२ |
| १९. | रत्नागिरी | ० | ७०९ |
| २०. | सातारा | ३०८ | १५९ |
| २१. | सिंधुदूर्ग | ८५० | ३७२ |
| २२. | यवतमाळ | २९८ | १३१४ |
| | एकूण | **६४१९** | **७६६८** |
| | प्राथमिक व उच्च प्राथमिक एकूण | **१४०८७** | |